वाचले:- १) महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन ) नियम-१९८२ मधील नियम १०(१)
२) मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय निगडी(श्रमिकनगर) यांचे दि.१२/०२/२०१६ रोजीचे पत्र
३) मा.आयुक्त यांचेकडील अधिकार प्रदान आदेश क्र.प्रशा/२/कावि/४४७/१५, दि.२०/१०/२०१५
४) मा.लेखाधिकारी,लेखा विभाग यांचे कडील दि.०८/०२/२०१६ चे घरबांधणी अग्रीम नादेय प्रमाणपत्र.
५) मा.अतिरिक्त आयुक्त यांचे कडील दि. 05 /03 /२०१६ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र. माध्य/शि/१/कावि329/१६
दि. 5 /3 /२०१६

विषय – <u>नियत वयोमानानूसार सेवानिवृतीबाबत.</u>
**श्रीम.शिंदे पुष्पा हरिश्चंद्र, मुख्याध्यापिका**
**(संगणक क्रं.५७३२)**

आदेश,

**श्रीम.शिंदे पुष्पा हरिश्चंद्र, मुख्याध्यापिका** हया पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहा.शिक्षका या पदावर माध्यमिक शिक्षण विभागात दि.१८/०९/१९८२ रोजी रूजू झालेले आहेत. **श्रीम.शिंदे पुष्पा हरिश्चंद्र, मुख्याध्यापिका,** यांची जन्मदिनांक ०६/०३/१९५८ अशी असून त्यांच्या वयास दिनांक ३१/०३/२०१६ रोजी ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने **श्रीम.शिंदे पुष्पा हरिश्चंद्र, मुख्याध्यापिका,** यांना ३१/०३/२०१६ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानूसार सेवानिवृत करणे आवश्यक आहे.

शासकीय कर्मचारी तो ज्या महिन्यात ५८ वर्ष वयाचा होईल,त्या महिन्याच्या अखेरच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवानिवृत होईल,तसेच ज्या शासकीय कर्मचा-याची जन्मतारीख ०१ असेल तो कर्मचारी यथास्थिती ५८ वर्ष वयाचा होताच मागील महिन्याच्या शेवटच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवानिवृत होईल,अशी महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृती वेतन ) नियम-१९८२ मधील नियम १०(१) मध्ये तरतूद आहे.या तरतूदीप्रमाणे **श्रीम.शिंदे पुष्पा हरिश्चंद्र, मुख्याध्यापिका** हया दिनांक ३१/०३/२०१६ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत होतील.

**श्रीम.शिंदे पुष्पा हरिश्चंद्र, मुख्याध्यापिका,** यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नसून त्यांचेकडून महानगरपालिकेस घरबांधणी कर्ज रक्कम येणे बाकी नसले बाबत वाचले क्र. ४ अन्वये मा. लेखाधिकारी,लेखा विभाग यांनी नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे. तसेच वाहन कर्ज,संगणक कर्ज,घर दूरूस्ती कर्ज,वैद्यकीय अग्रीम तसेच माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचेकडील कर्ज येणे बाकी नाही व इतर कोणत्याही प्रकारचे येणे बाकी नसलेबाबतचे दाखले त्यांनी सादर केले आहेत.तसेच **श्रीम.शिंदे**



Scanned with CamScanner

पुष्पा हरिश्चंद्र, मुख्याध्यापिका यांना सेवासातत्य देण्यात आलेले नाही. श्रीम.शिंदे पुष्पा हरिश्चंद्र, मुख्याध्यापिका यांचे सेवानिवृतीबाबत मुख्याध्यापकांनी शिफारस केली आहे.

सबब,मी शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८,उपरोक्त संदर्भ क्र. ३ अन्वये विभाग प्रमुख म्हणुन मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृती वेतन ) नियम-१९८२ मधील तरतूद या आदेशान्वये श्रीम.शिंदे पुष्पा हरिश्चंद्र, मुख्याध्यापिका, यांना दिनांक ३१/०३/२०१६ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तुत आदेशाची सविस्तर नोंद श्रीम.शिंदे पुष्पा हरिश्चंद्र, मुख्याध्यापिका यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

सही/--
अतिरिक्त आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे ४११०१८

प्रती,

श्रीम.शिंदे पुष्पा हरिश्चंद्र, मुख्याध्यापिका
माध्यमिक वियालय निगडी(श्रमिकनगर)

प्रतः- १) लेखा शाखा

२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष, ( प्रशासन ) सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष,कामगार कल्याण विभाग

३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४

४) माध्यमिक वियालय निगडी(श्रमिकनगर)
२/- पुढील कार्यवाहीसाठी

05/3/16

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.